# Executive Summary of the UGC Minor Research Project

# 2017 - 2018 & 2018 - 2019

Sanction Letter No. 23-1668/14 (General/14 (WRO) XII Plan
Dated 29 Jun. 2017

"A study of Rural citizens of Buldana District with reference to their financial literacy and awareness of financial transaction"

**"बुलडाणा जिल्ह्यातील ग्रामीण नागरिकांची वित्तीय साक्षरता व आर्थिक व्यवहार विषयक जाणीवांचे व जागृतीचे अध्ययन"**

**- Submitted by -**

## Prof. Dr. P. N. Ladhe

Head & Associate Professor

Principal Investigator

Department of Commerce

## Janata Kala-Vanijya Mahavidyalaya, Malkapur

Dist. Buldhana Pin Code - 443 101 (Maharashtra)

**Date of Completion of the Project**
**31-3-2019**

# बुलडाणा जिल्ह्यातील ग्रामीण नागरीकांची वित्तीय साक्षरता व आर्थिक व्यवहार विषयक जाणीवांचे व जागृतीचे अध्ययन

## प्रस्तावना :-

कोणत्याही देशाच्या आर्थिक प्रगतीसाठी विविध साधनांचे जागृत व्यवस्थापन अत्यंत आवश्यक ठरते. या साधनामध्ये भौतिक साधने, मौद्रीक साधने व वित्तीय साधनांचा समावेश होतो. केवळ साधन संपत्तीच्या विपुलतेने आर्थिक विकास साधत नाही, तर या साधनांचा व साहित्याची काळजीपूर्वक वापर व नियोजन करणेही आवश्यक ठरते. साधनाचचे व्यवस्थापन करण्यासाठी जागरुकतेची जाणीव आणि माध्यमांचे ज्ञान असणे आवश्यक असते.

ग्रामीण भागामध्ये वित्तीय साधनांची जाणीव व त्यांच्या कार्यक्षम विनियोजनाबाबत पर्याय जागृती आहे काय ? याचा अभ्यास करणे अगत्याचे आहे. ग्रामीण भागात नैसर्गिक साधन पंसत्तीची मर्यादित उपलब्धता आहे हे जरी सत्य असले तरी त्या सोबतच या साधनांचे कार्यक्षम विनियोजन होत नाही, हे देखील महत्त्वाचे तथ्य आहे.

ग्रामीण नागरीकांच्या वित्तीय साधनांविषयीच्या जाणीव कशा स्वरुपाच्या आहे या साधनांचा कार्यक्षम व प्रभावी वापर करण्यास ते सक्षम आहे काय ? आणि वित्तीय साधनांच्या विविधतेची, कार्याची व उपयोगितेची त्यांची जाणीव सखोल आहे काय ? हा अभ्यासाचा विषय आहे. या दृष्टीकोनातून प्रस्तूत अभ्यास प्रकल्प घेण्याचे योजले आहे.

## प्रकल्पांचे विधान :-

ग्रामीण भागात दारिद्र्याचे दृष्टचक्र प्रभावीपणे कार्यरत आहे, हे लक्षात येते. अत्यल्प उत्पन्न निर्मितीची मर्यादित साधने, उपलब्ध साधनांचा अकार्यक्षम वापर, प्राप्त उत्पन्नाची सिमित पातळी आणि बचतीचे न्याय प्रमाण यामुळे पुर्नगुंतवणूकीची मर्यादित मात्रा अशा स्वरुपाचे हे दृष्टचक्र आहे. या विषयाच्या ग्रामीण भागातील नागरीकांना प्राप्त उत्पादक साधनांचा व वित्तीय साधनांचा कार्यक्षम वापर कशाप्रकारे करता येईल याचे पूर्ण ज्ञान असणे अत्यंत आवश्यक आहे. वित्तीय व्यवहार विषयक विविध घटक या घटकांचा दैनंदिन आर्थिक व्यवहारांवर होणारा प्रभाव आर्थिक व्यवहारच कार्यक्षम व्यवस्थापन या विषयी

ग्रामीण नागरीकांना पुरेशी माहिती देणे व आकलन होणे आवश्यक आहे. हे आकलन होण्यासाठी वित्तीय साक्षरता व वित्तीय जाणीवांची निर्मिती झाली पाहीजे. या दृष्टीने सदर विषयांचे अध्ययन करण्यात येत आहे.

## सदर विषयाचे शीर्षक (Project Title) :-

**“बुलडाणा जिल्ह्यातील ग्रामीण नागरीकांची वित्तीय साक्षरता व आर्थिक व्यवहार विषयक जाणीवांचे व जागृतीचे अध्ययन”**

## विषयाची उद्दिष्टे :-

ग्रामीण भागात आधुनिक वित्तविषयक संकल्पना योग्य प्रकारे रुजलेली नाही. त्यामुळे ग्राहकांना वित्तीय व गुंतवणूकीविषयक संधीचा पुरेसा लाभ घेता येत नाही. ह्या वित्तीय संधी कशाप्रकारे उपलब्ध होतात, आणि यासाठी लागणारी वित्तीय साक्षरता या बाबींचा प्रस्तूत संशोधनात विचार करण्यात आला आहे. म्हणून प्रस्तूत संशोधनाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे निर्धारीत करण्यात आली आहे.

१) ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना वित्तविषयक जाणीवांचे आकलन करणे.

२) ग्रामीण भागातील नागरीकांच्या वित्तीय साक्षरतेच्या पातळीचे मूल्यमापन करणे.

३) वित्तीय साक्षरता व वित्तीय जाणीव यांच्यातील परस्पर संबंध पडताळून पाहणे.

४) वित्तीय जाणीवांच्या निर्मितीसाठी वित्तीय साक्षरतेचा लाभदायक वापर व्हावा याससाठी ग्रामीण नागरीकांना उपयुक्त प्रशिक्षण कार्यक्रमाचा आराखडा तयार करणे.

## मुलभूत व आवश्यक परिभाषा :-

प्रस्तूत संशोधनासाठी संशोधकाने खालील महत्त्वपूर्ण परिभाषेच्या माध्यमातून विषयाची मर्यादा निश्चित केली आहे.

### १) वित्तीय साधने :-

वित्तीय साधने या संज्ञेत वित्त निर्मिती करणाऱ्या व मौद्रिक मूल्य असणाऱ्या सर्व संपत्तीचा समावेश होतो.

### २) वित्तीय जाणीव :-

उपलब्ध आर्थिक व मौद्रिक साधनांचा कार्यक्षम वापर तसेच त्यांचे लाभ निर्मिती अथवा विनियोजनाच्या माध्यमातून वाढीव प्राप्तीसाठी करावयाच्या प्रयत्नांची जाणीव.

### ३) वित्तीय साक्षरता :-

विविध वित्तीय साधने त्यांच्या प्रकार उपयुक्तता व मर्यादा त्यांचे प्रकाार व उपयुक्तता या विषयाची माहिती.

## उपसिध्दांत :-

प्रस्तूत संशोधनासाठी संशोधकाने खालील गृहितके प्रमाण म्हरून आधारासाठी घेतली आहे.

१) ग्रामीण भागातील नागरीकांना वित्तीय साधने, त्यांचे प्रकारव उपयुक्तता या विषयीचे पर्याप्त ज्ञान व आकलन नाही.

२) विविध गुंतवणूक व वित्त विनियोजनाचा तंत्राच्या जाणीवेचा ग्रामीण भागातील नागरीकांमध्ये अभाव आढळतो.

३) मर्यादित साधने, सिमित उत्पन्न व माहितीचा अभाव यामुळे ग्रामीण भागात अपेक्षित वित्तीय जाणीव निर्माण होत नाही.

## अनुमान आणि निष्कर्ष –

प्रस्तुत अभ्यास हा ग्रामीण भागातील नागरिकांची वित्तीय साक्षरता व आर्थिक जाणीव यांच्या संदर्भात आहे. आर्थिक बदल घडवून आणावयाचे असल्यास वित्तीय साक्षरता अत्यंत महत्वाची असते. वित्तीय साक्षरतेशिवाय समाजातील नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणात आर्थिक बदल आणि परिवर्तन होत नाहीत. कारण पैसा हाच सर्व आर्थिक व्यवहारांचा मूलभुत आधार आणि कारक आहे. पैसा कमविणे जेवढे महत्वाचे आहे तेवढाच त्यांचा विवेकपूर्ण वापर करणे देखील महत्वाचे आहे. पैशाचा योग्य विनियोग करण्याची त्यावर उचित उत्पन्न प्राप्त करण्यासाठी वित्तीय साक्षरता अत्यंत आवश्यक आहे. या दृष्टीने वित्तीय साक्षरतेचे तीन घटक आहेत ते पुढील प्रमाणे –

१) वित्तीय साक्षरते विषयी जाणीव

२) वित्तीय व्यवहारांचे ज्ञान

३)	वित्तीय अर्थव्यवहार आणि विनियोग याबाबत सुस्पष्ट आणि नेमके ज्ञान

जोपर्यंत समाजात या प्रकारची वित्तीय साक्षरते विषयी जाणीव निर्माण होत नाही तोपर्यंत समाजात आर्थिक व्यवहारांना योग्य दिशा व गती प्राप्त होत नाही.

भारत हा एक कृषी प्रधान आणि बहुल देश आहे. भारतातील ६५% जनता ग्रामीण भागात राहते. या जनतेला अद्यापही किमान व आवश्यक क्रियात्मक साक्षरता प्राप्त झालेली नाही. आधुनिक अर्थव्यवहार वित्तीय रचना आणि कार्यपध्दती याविषयीचे त्यांचे ज्ञान तोकडे आहे. त्यामुळे त्यांचे आर्थिक वित्तीय व्यवहारात शोषण होते. आर्थिक आणि वित्तीय व्यवहाराची योग्य जाणीव नसल्यामुळे  जोखीम गुंतवणूक बचत परतावा आणि योग्य विनियोगाची संधी याविषयी हा समाज अद्यापही मार्गदर्शनाचा शोध घेत आहे. या समाजाला क्रियात्मक साक्षरते सोबतच वित्तीय साक्षरतेची अत्यंत आवश्यकता आहे. या दृष्टीने शासनाचा या स्तरावर प्रयास सुरू झालेलाच आहे. त्यासोबत अनेक स्वयंसेवी शैक्षणिक संस्था देखील कार्यरत आहेत. त्यांच्या या कार्याचा ग्रामीण भागातील नागरिकांच्या साक्षरता जागृतीवर आणि आर्थिक व्यवहार विषयक जाणीवांच्या क्षेत्रात कार्यपरिवर्तन घडून आले आहे. हे तपासणे प्रस्तुत प्रकल्पाचा उद्देश आहे. या दृष्टीने करण्यात आलेल्या सर्वेक्षणाची महत्वाची निरिक्षणे व निष्कर्ष पुढील प्रमाणे आहेत.

**सर्वेक्षणातील निरिक्षणे –**

प्रस्तुत सर्वेक्षणासाठी संशोधकाने ९०० नागरिकांचे सर्वेक्षण केले आहे. त्या आधारावर खालील निरिक्षणे नोंदविली आहेत.

## अ)	ग्रामीण नागरिकांचे प्रतिनिधीक व्यक्तीचित्र –

प्रस्तुत अभ्यास बुलडाणा जिल्ह्यातील ग्रामीण नागरिकांच्या संदर्भात करण्यात आला आहे. हा अभ्यास करण्यासाठी बुलडाणा जिल्ह्यातील १३ तालुक्यातील ९०० ग्रामीण नागरिकांशी संपर्क साधण्यात आला आहे. त्यांच्याशी प्रत्यक्ष भेट होऊन त्यांच्या मुलाखती घेण्यात आल्या त्यामुळे स्त्री व पुरूषांचे प्रमाण जवळ जवळ समान घेतले आहे. या आधारावर ग्रामीण नागरिकांचे व्यक्तीचित्र पुढीलप्रमाणे लक्षात येते.

१)	प्रातिनिधीक ग्रामीण नागरिक मुख्यत्वे करून ३५ ते ४५ या वयोगटातील उत्तरदाता म्हणून निवडले आहेत. त्यापैकी ४८% स्त्रिया व ५२% पुरूष उत्तरदाते आहेत. या सर्व नागरिकांपेक्षा बहुंख्य (७२%) नागरिक ग्रामीण भागातील असून ते प्रशिक्षित असून ते मुख्यत्वे करून त्याच परिसरात दीर्घकाळापासून निवास करणारे आहेत. ६०% नागरिक आपल्या ग्रामीण भागातील शेती व्यवसाय करीत असून त्यांची

कुटूंबसंख्या सरासरी ५ आहे. तर त्या कुटूंबातील ५ पैकी केवळ कमावते सदस्य मात्र प्रातिनिधीक रूपात दोन आहेत. या प्रातिनिधीक कुटूंबाचे सरासरी उत्पन्न ५०,००० ते १,००,००० रूपये पर्यंत ३४%, १,००,००० ते १,५०,००० रूपये पर्यंत १८% तर १,५०,००० ते २,००,००० रू. पर्यंत १२%, २,००,००० ते २,५०,००० रूपये २६% तर २,५०,००० रू. पेक्षा जास्त १०% याप्रमाणे आहेत.

यावरून असे लक्षात येते की, प्रातिनिधीक उत्तरदाता आर्थिक निम्न  व कनिष्ठ आर्थिक गटातील आहे आणि त्यांचे उत्पन्न प्रामुख्याने शेती क्षेत्रावर अवलंबून असल्यामुळे ते नियमित स्वरूपाचे नसल्यामुळे त्याला पर्याप्त वित्तीय सुरक्षितता उपलब्ध नाही.

## २) आर्थिक नियोजन विषय जाणीव –

सदर उत्तरदात्यांचे उत्पन्न अनियमित आणि मर्यादित असल्यामुळे त्यांची आर्थिक नियोजनाविषयी जाणीव पूर्णत: स्पष्ट नाही. मुळातच आर्थिक आणि वित्तीय साधने ही मर्यादित असल्यामुळे त्यांचे उत्पन्न कमी आहे. या वित्तीय साधनांचा विवेकपूर्ण वापर करणे शक्य होत नसल्याचे स्पष्ट होते. उत्पन्नासाठी आर्थिक व वित्तीय साधने म्हणजे पैसा याबाबत निश्चित नियोजन विषयक जाणीवेचा अभाव आढळून येतो.

## ३) बचत गुंतवणूक आणि उत्पन्न या संकल्पना विषयी जाणीव –

बहुसंख्य उत्तरदात्यांना उत्पन्न या संकल्पनेचे पर्याप्त आकलन झालेले नाही असे लक्षात येते. बचत म्हणजे उत्पन्न किंवा गुंतवणूक म्हणजे उत्पन्न किंवा बचत व गुंतवणूकीपासून उत्पन्न मिळते या बाबींचे त्यांना आकलन झालेले नाही असे लक्षात येते. प्राप्त झालेला प्रत्येक पैसा म्हणजे उत्पन्न आहे ही कल्पना अद्यापही त्यांना सुस्पष्ट झालेली नाही. उत्पन्नाचे नियमित व अनियमित असे वर्गीकरण तसेच उत्पन्न स्त्रोताविषयी त्यांच्या कल्पना अस्पष्ट आहेत.

## ४) खर्च वजा जाता राहिलेली रक्कम म्हणजे बचत –

खर्च वजा जाता राहिलेली रक्कम म्हणजे बचत ही बाब सध्या उत्तरदात्यांकरीता अस्पष्ट आहे. परिणामत: बचत आणि उत्पन्न यामध्ये गफलत होते. बचत आणि गुंतवणूक ह्या संकल्पना उत्तरदात्यांच्या सुस्पष्ट नाहीत. ज्यावर परतावा प्राप्त होतो अशी बचत म्हणजे गुंतवणूक या संकल्पनेची त्यांना उचित माहिती देणे आवश्यक आहे.

## ५) वित्तीय उद्दिष्टांची जाणीव –

आपण दीर्घकाळात आपले उत्पन्न स्थिर करण्याची ठराविक वित्तीय उद्दिष्ट निश्चित करून ती साध्य केली पाहिजेत ही बाब अद्यापही अस्पष्ट आहे. त्यामुळे उत्तरदात्यांचे वित्तीय नियोजन विषयक जाणीव अस्पष्ट आहे. त्यामुळे वित्तीय उद्दिष्टांविषयी जाणीव अस्पष्ट आहे.

**६) जोखीम आणि परतावा या विषयीची जाणीव –**

संपूर्ण बुलडाणा जिल्ह्यातील १३ तालुक्यातील नागरिकांचा आर्थिक व वित्तीय व्यवहार विषयक जाणीवांचा अभ्यासाकरीता ९०० नागरिकांचे सॅम्पल निवडले असता त्यातील ४४% उत्तरदात्यांना जोखीम म्हणजे काय? कोणत्या कारणांमुळे जोखीम निर्माण होते. आणि जोखीमीचे गुंतवणुकीवर व त्यावरील परताव्यावर होणारे परिणाम याविषयीची जाणीव नाही. आर्थिक जोखीम म्हणजे काय? बाजारातील कोणते घटक आर्थिक जोखीम निर्माण करतात आणि त्यांचे संभाव्य परिणाम याविषयी त्यांच्या संकल्पना बहुसंख्य उत्तरदात्यांच्या अस्पष्ट आहेत.

**७) दीर्घ व अल्प काळाची गुंतवणूक माध्यमे –**

दीर्घ व अल्प काळासाठी गुंतवणूक कशी करावी याकरीता कोणती माध्यमे आहेत याबाबत ५५% उत्तरदात्यांच्या संकल्पना अस्पष्ट आहेत. गुंतवणूकीचे माध्यम बदलल्यास परताव्याचे स्वरूप बदलते याचे त्यांना पूर्ण आकलन झालेले नाही. त्यामुळे त्यांच्याकडील उपलब्ध पैशाहून बचत झालेल्या रक्कमचा योग्य वापर करण्यात ते अपयशी होत आहेत.

**८) कर्ज आणि गुंतवणूक –**

कर्ज घेणे हा प्रत्येकाकरीता काही परिस्थितीत आवश्यक ठरते परंतु या कर्जाचे स्वरूप व्याजदर, उपयुक्तता आणि त्याचा आर्थिक परिणाम याविषयी ४८% उत्तरदाते संभ्रमात आहेत. आपण कर्ज का घेतो त्याचा आपल्या वित्तीय स्थितीवर काय परिणाम होईल या विषयीची त्यांची जाणीव निश्चित स्वरूपाची नसल्यामुळे यासारख्या कर्जाचा विपरित परिणाम होतो. याची त्यांना जाणीव नसून याबद्दल त्यांचे अज्ञान जाणवते. त्यावरून कर्जविषक साधनांची त्यांची कल्पना अस्पष्ट आहे. याचा परिणाम बरेच वेळा त्यांना अधिक व्याज दराने कर्ज घ्यावे लागते. बँका किंवा औपचारिक संस्था (कमी व्याज दरावर कर्ज देणाऱ्या संस्था) कडून कर्ज घेतल्यास कर्जाचा बोजा कमी होऊन त्याचा परतावा अल्पदरावर केला जाऊ शकतो याचे त्यांना प्रशिक्षण देणे आवश्यक आहे.

**९) वित्तीय व गुंतवणूक पर्याय व गुंतवणुक तंत्र –**

आपली बचत कशाप्रकारे करावी की जेणेकरून कोणत्या गुंतवणूक पर्यायावर अधिक परतावा मिळू शकेल. याविषयी उत्तरदात्यांचे एकमत नाही. गुंतवणूक जोखीम व परतावा याविषयी ६४% उत्तरदात्यांच्या कल्पना वास्तवाला धरून नाही. ४१% उत्तरदात्यांच्या गुंतवणूक माध्यम व गुंतवणूक माध्यमापासून परतावा यातील परस्पर संबंध स्पष्टपणे लक्षात येत नाही.

## वित्तीय साक्षरतेविषयी जाणीव :

बहुसंख्य ५६% उत्तरदाते विविध प्रकारचे आर्थिक व्यवहार रोख स्वरूपात करतात केवळ ३१% उत्तरदाते डिजीटल तंत्राचा (Digital) वापर करतात. त्यात डेबिट कार्ड, ए.टी.एम., क्रेडीट कार्ड, भिम ॲप (Debit card, ATM, Credit card, Bhim App)अशा विविध तंत्रांचा वापर करतात. यातून हे लक्षात येते की, बहुसंख्य उत्तरदात्यांना रोख व्यवहार करणे अधिक सुरक्षित आहे त्यात फसवणूक नाही असे ५३% उत्तरदात्यांना वाटते. तर ४२% उत्तरदात्यांना अधिकोष व्यवहार हे अधिक सुरक्षित विश्वासार्ह व नियमित स्वरूपाचे आहे असे वाटते.

२) ८८% उत्तरदात्यांचे अधिकोषात खाते असून बहुसंख्य उत्तरदात्यांची जनधन योजना व बचत खाते उघडले आहे. सद्य स्थितीत ए.टी.एम. ही लोकप्रिय सेवा असून ६८% उत्तरदाते ए.टी.एम. सुविधेचा वापर करतात. ही सुविधा मुख्यत्वे करून पैसे काढणे व पैसे जमा करणे याकरीता वापरली जाते. ७२% उत्तरदाते त्यांना अधिकोष हे आर्थिक व्यवहारांसाठी सुरक्षित संस्था वाटते त्यांच्या दृष्टीने पैशाची सुरक्षितता हमी आणि आर्थिक व्यवहारांचा पूरावा म्हणून अधिकोष ही योग्य संस्था आहे असे वाटते. ५१% उत्तरदात्यांची राष्ट्रीयकृत बँकेत खाती असून ४६% उत्तरदात्यांची सहकारी बँकेत खाते आहेत.

## वित्तीय साक्षरता व बँका विषयी सवयी –

६८% उत्तरदाते नियमित बचत करतात. उत्तरदात्यांच्या मते बचत ही आर्थिक व वित्तीय दृष्टीने चांगली सवय आहे. परंतु केवळ ५२% उत्तरदात्यांनी आपण बँकेत बचत जमा करतो असे मान्य केले आहे. तर इतर स्वरूपात बचत करणारे उत्तरदाते ४२% आहेत. बचतीचे महत्व १००% उत्तरदात्यांना मान्य आहे. ही बचत मुख्यतेकरून भावी गरजा पूर्ण करण्यासाठी ६१% अडचणीच्या वेळी उपयुक्त ६४%, मुलामुलींचे शिक्षण व विवाहा करीता ७२%, तर नवीन संपत्ती खरेदी करण्यासाठी ४१% या प्राधान्य क्रमाने

उत्तरदात्यांनी आपले मत व्यक्त केले आहे. बचत केल्याने आपला निधी (शिल्लक पैसा) सुरक्षित राहतो व त्यावर योग्य स्वरूपात परतावा मिळतो असे ७१% उत्तरदात्यांना वाटते.

बचत म्हणजे दीर्घकाळातील लाभाची तरतुद आहे असे ८२% उत्तरदात्यांना वाटते. परंतु यासाठी निवडण्यात येणारा गुंतवणूकीचा माध्यम वेगवेगळा आहे. शेती, घरे यामध्ये गुंतवणूक करणारे उत्तरदाते सर्वाधिक म्हणजे ५४% आहे. तर सोने, चांदी व इतर मुल्यवान वस्तूमध्ये गुंतवणूक करणारे उत्तरदाते ६४% आहेत. अधिकोषामध्ये दिर्घकालीन गुंतवणूक करणारे केवळ १३% तर म्युचल फंडा सारख्या स्त्रोतामध्ये केवळ ८% गुंतवणूक केली जाते. गुंतवणूकीचे माध्यम निवडतांना लाभ अथवा परतावा हा सर्वाधिक महत्वाचा निकष आहे. तर गुंतवणूक विषयक जोखीम हा त्या खालोखाल ५८% आहे. हा गुंतवणूकीच्या कालावधीनुसार गुंतवणूकीचे हेतू बदलतात असे ६३% उत्तरदात्यांना वाटते.

## आर्थिक व्यवहार विषयक संकल्पना व जाणीव –

आर्थिक व्यवहार करतांना कोणते घटक लक्षात घेतले जातात ही बाब फार महत्वाची आहे. सामान्यपणे प्रातिनिधीक गुंतवणूकदार व्यवहारांचे स्वरूप आणि जोखीमेचे स्वरूप यांना सर्वाधिक महत्व देतात ७३% तर व्यवहाराचे स्वरूप आणि व्यवहाराचे परिणाम व वित्तीय परिणाम याला त्या खालोखाल ५८% महत्व दिले जाते. परंतु कागदपत्रे व वैधानिक तरतूदी याविषयी मात्र संपूर्ण आकलन व जाणीव उत्तरदात्यांना आहे असे लक्षात येते. ४६% उत्तरदाते अनौपचारीक पध्दतीने व्यवहार करणे उपयुक्त मानतात. ५६% उत्तरदाते आपले व्यवहार वैधानिक पध्दतीने केल्यास ते सुरक्षित असल्याचे मानतात तर ७२% उत्तरदात्यांना आपले व्यवहार सुरक्षित आहेत असे वाटते. कारण त्याला कायद्याचे पाठबळ आहे. ७२% उत्तरदात्यांना वाटते असे स्पष्ट झाले आहे. वैधानिक व्यवहारात जोखीम कमी होते व त्यात पारदर्शकता येते व जोखीम कमी होते असे ६८% उत्तरदात्यांना वाटते. परंतु वैधानिक व्यवहारात अनावश्यक खर्च करावा लागते असे सुध्दा बहुसंख्य उत्तरदात्यांना वाटते. त्याकरीता विश्वासावर केलेले व्यवहार अधिक योग्य आहेत असे ३८% उत्तरदात्यांना वाटते. आर्थिक व्यवहार करतांना विश्वासार्हता हा सर्वाधिक महत्वाचा घटक आहे असे ५४% उत्तरदात्यांना वाटते. त्यासाठी खालील सुरक्षितता आणि लाभ हे घटक महत्वाचे आहे असे ५१% उत्तरदात्यांना वाटते. याउलट पारदर्शकता आणि वैधानिकता यांना यात कमी प्रतिसाद २२% मिळाला आहे असे लक्षात येते.

आर्थिक व्यवहारामध्ये गुंतवणूक करण्यासाठी एकाच माध्यमाची निवड करणे धोक्याचे आहे असे ४८% उत्तरदात्यांना वाटते. त्यामुळे एकाच वेळी अनेक बहुपर्यायी गुंतवणूक पर्याय निवडणे योग्य आहे असे बहुसंख्य उत्तरदात्यांना वाटते. विविध माध्यमात गुंतवणूक केल्यास सरासरी परतावा व लाभ क्षमता कमी होते असे ५८% उत्तरदात्यांना वाटते असे स्पष्ट झाले आहे.

## वित्तीय माहिती विषयक जाणीव –

आपण गुंतवणूक करण्यापुर्वी आवश्यक माहिती गोळा करतात का? असा नागरिकांना प्रश्न केल्यास ४२% उत्तरदात्यांनी सकारात्मक उत्तरे दिली आहेत. गुंतवणूक योग्य प्रकारे करण्याकरीता त्याबाबत उचित व पर्याप्त माहिती गोळा करण्यासाठी वेगळे असे प्रयास करावे लागत नाही असे ४०% उत्तरदात्यांना वाटते. बहुसंख्य असे ६८% उत्तरदाते परस्परांशी आपआपसात चर्चा करून व मित्रापासुन सल्ला घेतात. तर १२% उत्तरदाते वर्तमानपत्रे, आर्थिक मासिके व दूरदर्शन वरून माहिती प्राप्त करतात असे स्पष्ट झाले आहे. एकंदरीत गुंतवणूक करतांना तज्ञाचा सल्ला घेणे औपचारिक विवेकपूर्ण तंत्राचा वापर करणे ६१% उत्तरदात्यांना मात्र आवश्यक वाटत नाही.

## आधुनिक तंत्रज्ञान आणि गुंतवणूक –

आपण वित्तीय नियोजनामध्ये संगणक, इंटरनेट आणि स्मार्ट फोन चा वापर करतात काय याची ७८% उत्तरदात्यांनी नकारात्मक उत्तरे दिले आहे. अशा प्रकारच्या आधुनिक तंत्रज्ञान आपण प्राप्त केलेले नाही. अस्तित्वात असणारे विविध ॲपस् याबाबत माहिती प्राप्त झालेली नाही. त्यामुळे अशा आधुनिक साधनापासुन मिळु शकणारी वित्तीय स्त्रोताविषयीची माहिती प्राप्त होत नाही असे ६४% उत्तरदात्यांनी आपल्या प्रतिक्रिया दिल्या आहेत.

ए.टी.एम. आणि भिम ॲप यासारख्या सुविधांमुळे आर्थिक व्यवहार सुलभ झाले आहे असे ६८% उत्तरदात्यांना वाटते. तर या तंत्रज्ञानामुळे जलदता, सहजता आर्थिक व्यवहाराचे मोठ्या प्रमाणावर वाढली आहे असे ६५% उत्तरदाते म्हणतात. भिम ॲप आणि ए.टी.एम. या ॲपमुळे जोखीम कमी झाली आहे व सुरक्षितता वाढली आहे असे ६१% उत्तरदात्यांना वाटते.

स्मार्ट फोनची अनुपलब्धता म्हणजे मोबाईल वापराबाबतच्या प्रशिक्षणाचा अभाव यामुळे ३१% उत्तरदात्यांना या ॲपचा वापर करणे कठीण वाटते. या अशा विविध ॲप विषयी माहितीचा अभाव आहे असे १७% उत्तरदात्यांना वाटते. तर १२% उत्तरदात्यांच्या मते त्यात जटीलता आणि तंत्रज्ञानाची उपलब्धता योग्य वेळी कार्य करण्यासाठी कठीनता यामुळे हे ॲप उपयुक्त वाटत नाही.

## महत्वपुर्ण निष्कर्ष –

प्रस्तुत प्रकल्पाच्या अध्ययनातून खालील महत्वपूर्ण निष्कर्ष काढता येतात.

१) ग्रामीण भागातील गुंतवणूकदार आणि बचत करण्यामागे उत्तरदात्यांचे सर्वेक्षण व अध्ययन करण्यात आले आहे. त्यावरून त्यांचे व्यक्तीचित्र पुढीलप्रमाणे लक्षात येते.

प्रतिनिधीत उत्तरदाते व गुंतवणूकदार यांच्या मध्ये स्त्री व पुरूष यांचे प्रमाण जवळपास सम स्वरूपाचे आहे. या उत्तरदात्याचे सरासरी वार्षिक उत्पन्न २,००,००० ते २,५०,००० या दरम्यान असून व्यापारी स्वरूपाची बचत करण्यासाठी त्यांचेजवळ अतिरिक्त उत्पन्न नाही असे दिसून येते.

२) या बुलडाणा जिल्ह्यातील ग्रामीण भागातील उत्तरदात्यामध्ये वित्तीय व आर्थिक साक्षरतेची जाणीव मर्यादित आहे. या आपल्या देशातील अर्थव्यवस्थेमध्ये होणाऱ्या घडामोडी होणारे नवनवीन बदल, बाजारपेठेमध्ये व विपणन व्यवस्थेमध्ये होणारे बदल आणि वित्तीय जाणीवेच्या अभावामुळे ते आपल्या जवळ उपलब्ध असलेल्या वित्तीय साधनांच्या बचतीचा व गुंतवणूकी बाबत अतिरिक्त उत्पन्नाचा अपेक्षित विनियोग करण्यास अपयशी ठरतात.

३) जोखीम उत्पन्न नफा गुंतवणूक आणि बचत यासारख्या मुलभूत वित्तीय संकल्पना बाबत पर्याप्त जाणीवेच्या अभावामुळे त्यांना आपल्या उत्पन्नात गुंतवणूकीच्या माध्यमातून आपल्या उत्पन्नात अपेक्षित वाढ करता येत नाही. पर्यायाने उत्पन्नात वाढवा प्राप्त करता येत नाही. क्रियात्मक साक्षरतेच्या सिमीत उपलब्धतेमुळे ग्रामीण भागातील प्राप्त निधीत गुंतवणूकीची वित्तीय साक्षरतेची पातळी मर्यादित आहे.

४) ग्रामीण भागातील आर्थिक व सामाजिक परिस्थिती विविध प्रकारच्या सामाजिक अपसमजूती, सांस्कृतिक मर्यादा व विशिष्ट प्रकारच्या जिवन पध्दतीकडे असणारा कल यामुळे सिमीत झाली आहे. परंपरागत सांस्कृतिक व सामाजिक मुल्यांच्या प्रभावामुळे भौतिक आणि आधुनिक जिवन पध्दतीत अपेक्षित

स्विकार या वर्गाने अद्यापही केलेला नाही. परिणामतः गुंतवणूकीमुळे अतिरिक्त लाभ, अपेक्षित वाढण्यासाठी विविध आर्थिक व वित्तीय पर्यावरण शोध या बाबत हा वर्ग उदासिन आहे.

५) वित्तीय माहिती देणाऱ्या साधनांचा पर्याप्त वापर करणे आणि त्यायोगे आपले उत्पन्न वाढविले पाहिजे अशी मानसिकता या वर्गात नाही. परिणामतः वृत्तपत्र, दुरदर्शन, विविध वाहिन्या, विविध ॲप, संगणक, इंटरनेटची उपलब्धता असूनही या माध्यमाचा वित्तीय माहिती प्राप्त करण्यासाठी मर्यादित उपयोग होत आहे. आपले वित्तीय निर्णय घेण्यास व्यावसायिक तंत्राचा, चार्टड अकाऊन्टंट (CA) या व्यावसायिक तज्ञांचा वापर सुध्दा मर्यादित होत आहे.

## वित्तीय साक्षरतेचा प्रसार करण्यास खालील अडचणी संभवतात –

१) वित्तीय जाणीवांचा अभाव

२) आर्थिक पर्यावरणाविषयी पर्याप्त जाणीवांचा अभाव

३) वित्तीय बाजारपेठ व वित्तीय साधने याविषयी सिमीत माहिती

४) वित्तीय साक्षरतेचे महत्व योग्यप्रकारे आकलन न झाल्याने निर्माण होणाऱ्या अडचणी

५) वित्तीय साक्षरतेच्या प्रशिक्षणासाठी संघटीत स्वरूपात होणाऱ्या प्रयत्नांची मर्यादा

६) शासन व समाजसेवी संस्थांव्दारे वित्तीय साक्षरतेच्या प्रकारात घेतला जाणारा सिमीत पुढाकार

७) भौतिकवादी वृत्ती आणि अधिक लाभ कमविण्याच्या प्रेरणेचा अभाव

८) गुंतवणूकीबाबत अनेक अपसमज

९) आधुनिक गुंतवणूक तंत्राबाबत माहिती नसणे

१०) परंपरागत स्वरूपातील व मर्यादित लाभ देणाऱ्या वित्तीय माध्यमाबाबत आस्था व त्याकडे असणारा कल

११) म्युचल फंड आणि यासारख्या वित्तीय साधनाबद्दल माहितीचा अभाव

१२) जोखीम या संकल्पनेविषयी अपर्याप्त माहिती व अपसमज

१३) वित्तीय शिक्षण व ग्राहक शिक्षण याविषयी माहितीचा अभाव

१४) बँका ग्रामीण भागात जरी विस्तार करीत असल्या तरी देखील बँका विषयीच्या सवयी मध्ये मात्र अद्यापही अनुकूल बदल झालेला नाही.

१५) तंत्रज्ञानामुळे बँक ग्राहकाच्या जवळ आली आहे. बहुसंख्य ग्राहक ए.टी.एम व डेबीट कार्ड चा वापर करतात परंतु हा उपयोग अत्यंत सिमीत स्वरूपाचा आहे. त्यात अधिक विस्ताराची गरज आहे.

१६) भिम अ‍ॅप, ए.टी.एम. यासारख्या डिजिटल अ‍ॅपमुळे ग्रामीण भागात नविन वित्तीय जाणीव निर्माण होत आहे परंतू त्यासाठी वित्तीय शिक्षण व प्रशिक्षणाची नितांत आवश्यकता आहे.

## उपाय योजना –

ग्रामीण भागात गुंतवणूकी करिता बचत करणाऱ्या व्यक्ती आणि ग्राहक यांच्यात आर्थिक जागृती निर्माण करण्यासाठी त्यांच्यामध्ये वित्तीय साक्षरता व वित्तीय जाणीव रूजविण्यासाठी खालील उपाययोजना येथे सुचविण्यात येत आहे.

१) शैक्षणिक संस्था विशेषत: वाणिज्य महाविद्यालयांनी ग्रामीण भागात वित्तीय साक्षरता व आर्थिक जाणीव निर्माण करणाऱ्या शिबीरांचे व कार्यशाळांचे आयोजन केले पाहिजे.

२) वित्तीय जाणीव निर्माण करण्यासाठी मार्गदर्शक पुस्तिका आणि व्यवहार्य सुचना देणाऱ्या मार्गदर्शिका महाविद्यालयांनी प्रकाशित व प्रसारित कराव्यात.

३) सामजसेवी संस्था, जनहितार्थ कार्य करणारी मंडले आणि अशासकीय संस्थांनी एकत्र येवून वित्तीय जागृती व जाणीव निर्माण करणाऱ्या कार्यक्रमाचे आयोजन केले पाहिजे.

४) ग्रामीण भागात लोकप्रिय असणाऱ्या औपचारिक माध्यमांचा कल्पक व प्रभावी वापर केला पाहिजे. यामध्ये पथनाट्य, भारूड, किर्तन यासारख्या माध्यमाचा वेगळा धरतीवर प्रयोग करून समाजात आर्थिक जागरूकता निर्माण करण्यात आली पाहिजे.

५) ग्रामीण भागातील नागरिकांना शाळांमधून वित्तीय साक्षरतांच्या जाणीवा निर्माण करणाऱ्या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले पाहिजे.

६) ग्रामीण भागात वित्तीय साक्षरतेकरीता चलती प्रदर्शने (मोबाईल एक्झीविशन) चल वाहनांचा, मोबाईल व्हॅनचा वापर करून वित्तीय साक्षरतेचा प्रसार करणाऱ्या छोट्या चित्रफितीचा नाट्यरूप मासिकांचा आणि इतर दृकश्राव्य माध्यमांचा वापर करता येईल.

७)	अधिकोष आणि विमा संस्था यांना ग्रामीण भागात आपली उत्पादने लोकप्रिय करण्यासाठी ग्रामसभा, ग्रामपंचायतीच्या नेतृत्वाखाली विविध शैक्षणिक व लोकरंजन कार्यक्रमांचे आयोजन केले पाहिजे.

८)	वित्तीय साक्षरता करण्याच्या दृष्टीने स्वयंसेवकाचे पथक तयार करण्यासाठी अधिकोष संस्था, विमा कंपन्या आणि महाविद्यालयांनी एकत्र येऊन मोहिमा राबविणे आवश्यक आहे.

९)	ग्रामीण भागातील नागरिकांचे वित्तीय सर्वेक्षण करून घेवून त्यांच्या वित्तीय जाणीवा, मर्यादा व व बचत विषयक सवयी विषयी अभ्यासक्रम महाविद्यालयीन पातळीवर निर्माण केले जाऊ शकतात. याव्दारे कोणत्या प्रकारची वित्तीय माहितीची आवश्यकता आहे आणि त्यासाठी कोणते कार्यक्रम राबविले पाहिजे हे निश्चित करता येईल.

१०)	ग्रामीण भागात आयकर दाव्यांना बचत गुंतवणूक विषयक महितीचे प्रदर्शन व प्रशिक्षण देणारे कार्यक्रम आयोजित करता येतील.

## अनुमान –

एकंदरीत ग्रामीण भागात वित्तीय साक्षरतेची नितांत आवश्यकता आहे. ग्रामीण भागात उपलब्ध असणारा निधी योग्य प्रकारे प्रवाहित व्हावा त्याचा अर्थव्यवस्थेला भांडवल निर्मितीसाठी उपयोग व्हावा यासाठी वित्तीय व आर्थिक साक्षरतेची गरज आहे. वित्तीय साक्षरते अभावी ग्रामीण भागात गुंतवणूकदार आणि सामान्य नागरिकांना आपल्या उत्पन्नावर आणि बचतीवर योग्य परतावा मिळत नाही. जोखीम आणि अर्थव्यवस्था यांच्यातील संबंधाचे आकलन न झाल्यामुळे ग्रामीण नागरिकांना योग्य वित्तीय संधीचा लाभ घेता येत नाही ही बाब लक्षात घेता प्रस्तूत अध्ययनात काही उपाय योजना वर सुचविल्या आहेत त्याचा विचार झाला पाहिजे.

वरील सूचना व उपायांची अंमलबजावणी झाली तर याचा भारतीय अर्थव्यवस्थेला निश्चित चांगला फायदा होईल असे वाटते.

****